# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**5 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक मांडणी करून टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**मोहन ज्ञानवर्धिनी विद्यालय**

१७२/२, सोमवार पेठ, कराड,

ता. कराड, जि. सातारा

संदर्भ क्रमांक : मोज्ञा/सहल/२० दिनांक : १५ सप्टेंबर, २०१३

प्रति,

माननीय विभागीय आगारप्रमुख

परिवहन महामंडळ,

सातारा विभाग - महाराष्ट्र राज्य,

सातारा

विषय : शैक्षणिक सहलीसाठी बसगाड्यांची चौकशी करणेबाबत...

महोदय,

या वर्षी डिसेंबरमध्ये आमच्या शाळेची सहल जाणार आहे. या सहलीसाठी आम्हाला दोन बसगाड्यांची आवश्यकता आहे. त्या संबंधात शाळेचा सहलप्रमुख या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. तर विद्यार्थीसंख्या वाढली तर अजून एका बसची सोय करण्याची तयारी सुद्धा आपण ठेवावी. आमच्या सहलीचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

आम्ही आमच्या शाळेची सहल महाबळेश्वर येथे दि. २७ डिसेंबर ते दि. ३० डिसेंबर या कालावधीत नेणार आहोत. एकूण ६७ विद्यार्थी नक्की असून ६ शिक्षक व २ शिपाई असणार आहेत.

दोन बसगाड्यांचा प्रवासखर्च, विद्यार्थ्यांना मिळणारी प्रवासभाड्यातील सवलत, आगाऊ भरावी लागणारी रक्कम आणि अर्ज करण्यासाठी आवश्यक मुदत इत्यादीबाबत कृपया माहिती पुरवावी.

धन्यवाद.

आपला कृपाभिलाषी,

सहलप्रमुख,
मोहन ज्ञानवर्धिनी विद्यालय

सोबत : काही नाही.

**प्र.2)** पुढील रकाना टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी टंकलेखन यंत्रावर शाईने आखा. दर्शकबिंदू आवश्यक आहेत : **[गुण : ३०]**

**जयश्री गृहउद्योगाची उत्पादने विक्री दर्शविणारा तक्ता**

(वर्ष २०१२)

| अनु. क्रमांक | शहरांची नावे | कुरडाई | शेवया | सांडगे |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे .. | ९,१९२ | ६,१८२ | ४,०१६ |
| २. | ठाणे .. | १०२ | २९३ | १०२ |
| ३. | मुंबई .. | २,०१६ | ८,०१४ | ४,०१२ |
| ४. | सातारा .. | ७,०९८ | ६,१३२ | ८,०३३ |
| ५. | कोल्हापूर .. | ३,०७६ | ४०९ | ७१५ |
| ६. | इचलकरंजी .. | २,०१६ | २९३ | १०२ |
| ७. | आंबेगाव .. | ४,०१५ | ३,२०७ | ६,२८२ |
| ८. | इंदापूर .. | ३,०२७ | ९१६ | १,२०५ |